## पाच

# समारोप

# पाच

# समारोप

एकोणिसाव्या शतकातील उपेक्षित मानक-यांपैकी एक म्हणून बाबा पदमनजी यांचा उल्लेख करावा लागतो. ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केल्यामुळे त्यांच्या पदरी हे उपेक्षेचे दान पडले असावे. त्यांची वाङ्मयसंपदा विपुल आणि विविध स्वरूपी असली तरी ख्रिस्ती धर्माचे गुणगान करण्याच्या एकमेव हेतूमुळे निर्माण झालेली आहे. त्यांच्या वाङ्मय संभाराच्या, तसेच त्या कालखंडातील

साहित्याच्यासंदर्भातही 'अरुणोदय' या त्यांच्या आत्मचरित्राचे स्थान वैशिष्टयपूर्ण आहे. या आत्मचरित्राचा सामाजिक आणि वाङ्मयीन संदर्भातून अभ्यास करताना जे जाणवले त्याचा येथे उल्लेख करणे अनुचित ठरणार नाही.

पेशवाईच्या अस्तानंतर आलेल्या इंग्रजी राजवटीने आपल्याबरोबर नवी शिक्षणपध्दती आणली. तिच्या प्रभावामुळे एतद्देशीयांकडून आपली संस्कृती, धर्म, परंपरा यांचा तत्कालीन परिस्थितीच्या संदर्भात पुनर्विचार सुरू झाला. स्वधर्माचा कट्टरपुरस्कार, स्वधर्मात कालानुरूप सुधारणा आणि स्वधर्म हा वैगुण्ययुक्त असल्यामुळे परधर्माचा स्वीकार - हे तीन मतप्रवाह त्यामधून निर्माण झाले. शिक्षण प्रसाराच्या नावाखाली ख्रिस्तानुयायांचे हे धार्मिक व सांस्कृतिक आक्रमण परिणामकारक होते. त्याचा नवशिक्षितांवर चांगलाच प्रभाव पडला.

बाबांच्या कुटुंबातील धार्मिक वातावरण पारंपारिक स्वरूपाचे होते. या संस्कारात वाढलेल्या बाबांनी भावी आयुष्यात जरी धर्म बदलला तरी ते नास्तिक झाले नाहीत. त्यांनी धर्मांतर केले तरी त्यांची धर्मश्रध्दा अढळ राहिली. पुढे मिशन स्कूलमधील शिक्षणामुळे त्यांची धर्मचिकित्सक वृत्ती जागृत झाली. त्यामुळे त्यांना हिंदू धर्मातील ढोंग आणि विसंवाद जाणवला. पुढील काळात फ्रीचर्च शाळेतील वातावरणामुळे त्यांना ख-या धर्माचा शोध लागला.

वाचनात आलेली पुस्तके, धर्मविषयक व्याख्यानांचे श्रवण, मिशन-यांचा प्रभाव, 'ज्ञानोदया' शी असलेला सततचा संपर्क यामुळे हिंदुधर्म ईश्वरप्रणित नसल्याची व ख्रिस्ती धर्माच्या सत्यतेची त्यांची खातरी पटली. धर्म या एकाच शक्तीने त्यांच्या मनाचा अगदी बालपणापासूनच कबजा घेतला होता. ख्रिस्ती धर्माच्या सत्यतेची खातरी पटल्यानंतर त्यांनी आपले सारे आयुष्य ख्रिस्ती धर्म-प्रसारासाठीच वेचले. त्यांना समृध्द ऐहिक जीवनाचा मोह नव्हता. स्वत:ला पटलेला नवा धर्ममार्ग सर्वांनी स्वीकारावा हीच त्यांची उत्कट इच्छा होती. या

धार्मिक प्रबोधनासाठीच त्यांनी आपले सारे जीवन व्यतीत केले. त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या या जडणघडणीचे आकलन झाल्याशिवाय त्यांच्या लेखनातील एकांतिक ख्रिस्त निष्ठेचे स्पष्टीकरण होणार नाही.

इंग्रजांच्या आगमनामुळे इथल्या संस्कृतीमध्ये वास्तववादी, उपयुक्ततावादी आणि ऐहिक घटक मिसळले. त्यामुळे वाङ्मयाकडे ऐहिक अभ्युदयाच्या प्रचारकाची भूमिका आली. बाबांनीही आपल्या वाङ्मयाद्वारे नव्या सामाजिक विचारांचा पुरस्कार केला असला तरी स्वत:ला पटलेला नवा धर्म मार्ग परोपरीने विशद करण्याचा त्यांचा प्रामुख्याने प्रयत्न होता.

स्वमत प्रचारासाठी एखादे नियतकालिक हाताशी असणे ही बाबांसारख्या कर्त्या पुरुषाची गरजच होती. त्यांनी आपल्या संपादकीय कारकीर्दीत अनेक नियतकालिके चालविली आणि आबालवृध्दांना ख्रिस्ती धर्माची सर्वांगीण ओळख करून देण्याचा प्रयत्न केला. बिकट आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना नियतकालिक बंद करावे लागले तरी बाबांमधील संपादक पुन्हा नव्या नियतकालिकाद्वारे नव्या कल्पना मांडत असे, नवे प्रयोग करीत असे. बाबांचे निबंधलेखन प्रामुख्याने दीर्घ स्वरूपाचे आहे. ख्रिस्ती लेखकातील एक संयमित विचाराचा निबंधकार म्हणून त्यांचे स्थान अढळ आहे. सामान्यांना पेलणारी आणि परवडतील असे शब्दकोश तयार करण्यासाठी, मोल्सवर्थ, कँडीच्याच शब्दकोशांचे संक्षेपीकरण करावे या भूमिकेने त्यांनी सदर क्षेत्रात प्रवेश केला. परंतु आपल्या बुध्दिमत्तेच्या व कल्पकतेच्या बळावर त्यांनी ' शब्दरत्नावली ' सारखे मूलभूत आणि उपयुक्त स्वरूपाचे कार्य केले आहे. ' यमुनापर्यटन ' ही बाबांची कादंबरी विधवा पुनर्विवाहाच्या समस्येकडे निर्देश करणारी असली तरी तिचा जन्म धर्मप्रसाराच्या हेतूमधूनच झाला आहे. बाबांचे आत्मनिवेदनपर लेखनही त्यांच्यावरील ख्रिस्ती धर्माच्या परिणामाचे दर्शन घडविण्यासाठीच अवतरले आहे.

धर्मांतरापूर्वीच्या लेखनातून त्यांच्या मनावर पडत चाललेल्या ख्रिस्ती मताच्या प्रभावाचे स्पष्ट दर्शन घडत असले, तरी समाजाला अनिष्ट असणाऱ्या परंपरांचा निषेध व आवश्यक असणाऱ्या नवविचारांचा पुरस्कारही त्यांनी केला आहे. धर्मांतरानंतरची बाबांची साहित्यनिर्मिती विपुल असली तरी ती ख्रिस्ती धर्माचा प्रसार या एकमेव हेतूमधून जन्मली आहे. ख्रिस्ती धर्माविषयीच्या उत्कट आस्थेने त्यांच्या साऱ्या लेखनाला अगदी व्यापून टाकिले आहे.

समकालीन ख्रिस्ती लेखकांच्या तुलनेत बाबांची साहित्यनिर्मिती वैशिष्टयपूर्ण आहे. निबंध, कादंबरी, शैक्षणिक पुस्तके, कोशरचना, नियतकालिकांचे संपादन व व्यवस्थापन, चरित्र आत्मचरित्र इ. अनेक प्रांतांत त्यांनी संचार केला आहे. त्यांनी नित्य नव्या वाटा चोखाळल्या आहेत, नित्य नवे आकृतिबंध हाताळले आहेत. हे काम बाबांमधल्या प्रचारकाचे नसून कलावंताचे आहे. विपुलता व विविधता ही त्यांच्या लेखनाची वैशिष्टये समकालीन ख्रिस्ती लेखकांत नसल्यामुळे बाबा आधुनिक ख्रिस्ती मराठी वाङ्मयाचे जनक ठरतात.

एकोणिसाव्या शतकातील वाङ्मयाच्या संदर्भात बाबांच्या लेखनाचा विचार करताना जाणवते की, त्यांच्या लेखन, मुद्रणातील साक्षेप व शिस्त, लेखनात बहुश्रुतपणाचे पडलेले प्रतिबिंब, नियतकालिकांचे सुव्यवस्थित संपादन व व्यवस्थापन, ग्रंथांना सूचि व दर्शिका देऊन वाचकांची केलेली सोय, नानाविध संदर्भ व तळटीपा देऊन करण्यात येणारे विवेचन - त्यांच्या लेखनप्रपंचाच्या या वैशिष्टयांमुळे त्यांच्या साहित्याचे वेगळेपण सहज ध्यानी येते. ख्रिस्ती धर्माच्या स्वीकारामुळे सर्व प्रश्न सुटतील या आत्यंतिक श्रध्देने मात्र त्यांच्या लेखनातील वैचारिक समतोल ढळला आहे. असे असले तरी स्वत:ला पटलेल्या धर्माचा प्रसार करण्याची जिद्द बाळगणारे बाबा समकालीन कर्त्या पुरुषांपेक्षा वेगळे होते. त्यामुळेच त्यांच्या लेखनाविष्काराचेही स्वरूप समकालीन वाङ्मयापेक्षा वेगळे आहे.

'अरुणोदया'च्या संदर्भात आत्मचरित्राचे स्वरूप शोधताना ध्यानी

येते की, स्वत:च्या जीवनाचे दूरस्थपणाने व सिंहावलोकन वृत्तीने केलेले अवलोकन व त्या विषयीचे प्रांजळ निवेदन म्हणजे आत्मचरित्र होय. चरित्र व आत्मचरित्र यांची जातकुळी एकच असते. तरीही माणसाचा स्वत:विषयीचा दृष्टीकोण आणि त्याच्याबद्दलचा इतरांचा दृष्टीकोण यामध्ये जो फरक असतो, तोच आत्मचरित्र व चरित्र यांच्यामध्ये असतो. दैनंदिनी, संस्मरणे, स्मृतिचित्रे, खासगी पत्रव्यवहार ही आत्मचरित्राच्या कुळातील त्याची सारीच भावंडे एकमेकांना पूरक असली तरी ती एकमेकांचे पर्याय होऊ शकत नाहीत. हे सारे आत्मनिवेदनात्मक प्रकार भूतकाळाला आकार देत असले तरी आत्मचरित्रामधून होणारी भूतकाळाची मांडणी, तसेच वर्तमानकाळाने केलेला भूतकाळाचा भेद, या गोष्टी आत्मचरित्राला वेगळेपण देतात. आत्मचरित्रकाराची अव्यभिचारी सत्यनिष्ठा व तटस्थता या दोन गुणांमुळेच आत्मचरित्र हा वाङ्.मय प्रकार ललित व ललितेतर वाङ्.मयाच्या सीमेवर राहातो. असे असले तरी खरेखुरे आत्मचरित्र हे जीवनावर असा काही प्रकाश टाकू शकते की, त्या प्रकाशात इतरांनाही जीवनाचा अर्थ लावता येतो. श्रेष्ठ वाङ्.मयाच्या ठिकाणी हीच शक्ती असते.

एकोणिसाव्या शतकामध्ये आत्मनिवेदनाची प्रवृत्ती रुजलेली नव्हती. सामान्य माणसाने आत्मचरित्र लिहिणे म्हणजे उध्दटपणाची गोष्ट आहे, अशी समजूत रूढ असलेल्या या काळातील बाबांचे आत्मचरित्र, `अरूणोदय` वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यामध्ये त्यांनी स्वत:च्या मनात घडलेल्या धार्मिक उत्क्रांतीची हकीकत `ईश्वराने एका पाप्यावर परमदया केली` या श्रध्देतून सांगितली आहे. यामध्ये तत्कालीन सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक वातावरणाचे प्रतिबिंब उमटले असले तरी बाबांच्यापुढे सामाजिक इतिहास लिहिण्याचे प्रयोजन मात्र नव्हते.

धर्मांतरानंतर बराच कालावधी लोटल्यानंतर, एका विशिष्ट भूमिकेतून

आत्मचरित्र लिहावयास बसलेले बाबा, धर्मांतरापर्यन्तच्या आपल्या जीवनातील अनुभवांची सार्थ व साभिप्राय निवड करीत आहेत. स्वजीवनात ज्या गोष्टी आपातत: घडल्या होत्या त्यांची ख्रिस्ती शास्त्रप्रणित ईश्वरी नियोजन-कल्पनेच्या द्वारा पुनर्रचना करून बाबांनी आपली आत्मकहाणी सिध्द केलेली आहे. हे सर्व पाहाता ध्यानी येते की, `अरुणोदय` ही पूर्वनिश्चित लेखन-हेतूची योजनापूर्वक केलेली मांडणी आहे.

बाबांनी तत्कालीन समाजजीवन, परंपरा, धर्म यांचे समीक्षण करून ख-या धर्माचा शोध आयुष्यभर घेतला. त्यामुळे त्यांचे आत्मचरित्र समाज-जीवनापासून अलिप्त राहू शकत नाही. शिवाय त्यांनी घडविलेले समाजदर्शन यथार्थही आहे. याचे कारण म्हणजे, आपल्या धार्मिक बदलाची कहाणी सांगण्याकडे बाबांचे अवधान गुंतल्यामुळे समाज जीवनाच्या संदर्भांना वेगळा रंग देण्यास त्यांना अवसरही सापडलेला नाही. तसेच एका धर्मचिंतकाचे आत्मचरित्र म्हणूनही `अरुणोदया` तील समाज दर्शन विश्वासार्ह वाटते. समाज जीवनाबद्दलच्या बाबांच्या उत्कट व उस्फूर्त प्रतिक्रियांमुळे हे लेखन म्हणजे केवळ रूक्ष तपशिलाची कंटाळवाणी जंत्री होत नाही, उलट ते अधिक हृध व चैतन्यमय होऊ जाते. बाबांची ख्रिस्ती धर्मावरील अव्यभिचारी निष्ठा व त्यापोटी घडलेला हा लेखन-उद्योग ध्यानी घेताही, त्यांनी सामाजिक वास्तवाचे हेतुपूर्वक विकृतीकरण केले आहे असे जाणवत नाही.

`अरुणोदय` विशिष्ट हेतूपोटी निर्माण झालेले असल्यामुळे त्यांत बाबांच्या जीवनाचे पूर्ण चित्र नाही, त्यांच्या व्यक्तिमत्वाचेही पूर्ण चित्र नाही शिवाय `माझ्या जीवनात ज्या घटना घडल्या त्यात देवाचा हात आहे` अशी श्रध्दावृत्ती धारण केल्यामुळे `अरुणोदया` तील बाबांचे चित्र स्वाभाविक आहे असे म्हणवत नाही. म्हणूनच लिहितेवेळी बाबा भूतकाळात रंगून जात असले तरी `हिंदू धर्मातील बाबां` चे ते वास्तव चित्रण करू शकत नाहीत. त्यांच्या

व्यक्तिमत्वाच्या आविष्करणाच्या या मर्यादा ध्यानी घेतल्या तरी अंतर्मुख वृत्तीतून केलेल्या आत्मविश्लेषणामुळे त्यांच्या स्वचित्रणाला लालित्याचे रंग चढले आहेत. 'अरुणोदया' तील इतर व्यक्तींची चित्रणे ठीक असली तरी पत्नीच्या चित्रणाबाबत त्यांनी अनुत्साह दाखविला आहे. अगदीच आवश्यक असलेल्या ठिकाणी केवळ त्रोटक उल्लेखांवर भागविले आहे.

बाबांच्या जीवन कहाणीमधील काही वादग्रस्त प्रसंगाचे सत्यशोधन करताना पुढील वस्तुस्थिती जाणवली -

अ) परमहंस मंडळीच्या त्यागाबद्दलच्या बाबांच्या स्पष्टीकरणाचे सत्यशोधन केल्यानंतर असे वाटते की, परमहंस मंडळीत प्रवेश करण्या आधीच त्यांचा ख्रिस्ती धर्म स्वीकाराचा निर्णय झालेला होता. ही संस्था आपल्या निर्णयाला मूर्तरूप आणण्यास उपयोगी पडत नाही हे त्यांच्या ध्यानी आले तेव्हा ते तिपासून दूर झाले.

ब) धर्मांतरामागील बाबांची विचारसरणी काहीशी अपरिपक्व व एकांगी असली तरी त्यांचे धर्मांतर हे मनाच्या प्रामाणिकपणाचे द्योतक आहे.

क) घटस्फोटाचा खर्च भागविण्यासाठी त्यांनी 'यमुनापर्यटन' ही कादंबरी लिहिली नाही, तर या कादंबरी पासूनच्या उत्पन्नाचे पैसे या कामी उपयोगी पडले होते.

ड) बाबांचे पत्नीविषयक वर्तन त्यांच्या एकंदर व्यक्तिमत्वाशी सुसंगत आहे. या वर्तनाच्या वर्णनात मात्र त्यांनी अलिप्ततेचा जाणवण्यासारखा ठसा उमटविला आहे.

'अरुणोदया' मागील लेखनहेतूमुळे व बाबांच्या ज्या विशिष्ट मानसिक अवस्थेत लेखन झाले त्यामुळे या लेखनशैलीचे स्वरूप निश्चित झाले आहे. कारण शैली ही मनोवृत्तीवर अवलंबून असते. आणि मनोवृत्ती ही विशिष्ट परिस्थितीमुळे संस्कारित होते. प्रांजळपणा हे बाबांच्या व्यक्तिमत्त्वाचेच एक अंग असल्यामुळे त्याचे प्रतिबिंब शैलीत पडले आहे. वाचकाला विश्वासात घेऊन त्याच्यापुढे आपले अंत:करण खुले करण्याची हातोटी हे बाबांच्या निवेदनाचे एक वैशिष्ट्य आहे. कोणत्याही प्रसंगात अतिरेकी भावनेच्या आहारी न जाता वैचारिक समतोल राखणेही बाबांना साधते. आशयाशी उपदेशाचे तात्पर्य न चुकता जोडण्याच्या धडपडीतून निवेदनात काहीशी कृत्रिमता निर्माण झाली असली तरी 'अरुणोदया' ची शैली बाबांना अभिप्रेत असलेला आशय वाचकांपर्यन्त तितक्याच समर्थपणे पोहोचविण्यात यशस्वी झाली आहे.

आत्मचरित्राच्या निकषावर 'अरुणोदया' चे मूल्यमापन करताना ध्यानी येते की, बाबांनी भूतकाळाची पुनर्रचना केली आहे पण सत्याचे विकृतीकरण केलेले नाही. इतरांविषयीचे सत्यकथन करतानाही त्यांना स्वत:वर असलेल्या जबाबदारीची जाणीव आहे. बाबांच्या प्रांजळपणामुळेच वाचक 'अरुणोदयाशी' समरस होऊ शकतो. घटिताचे चित्रण व त्याविषयीचे चिंतन या दोन्ही प्रक्रिया एकाच वेळी साधण्यात बाबा यशस्वी होतात. गतजीवनाचे चित्रण करताना त्यांनी काही को-या जागा ठेविल्या आहेत त्यामोठ्या सूचक, बोलक्या, अर्थपूर्ण आहेत. एखाद्या ललित कृतीप्रमाणे आत्मचरित्रातही जेवढे सांगितलेले असते त्याहीपेक्षा अधिक सुचविलेले असते असे या को-या जागांकडे पाहून म्हणावेसे वाटते.

'एका पाप्यावर ईश्वराने जी परमदया केली तीमधून उतराई होण्यासाठी त्याच्या कर्तृत्वाचे गुणगान गावे' या हेतूमधून 'अरुणोदया' ची निर्मिती

झाली असली, तरी त्याचे अवलोकन करीत असताना असे जाणवते की, `अरुणोदया` त जसे एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील समाज जीवनाचे विश्वासार्ह दर्शन घडते , त्याचप्रमाणे बाबांची आत्म-विश्लेषणाची प्रवृत्ती, उत्कटता, प्रांजळपणा, स्वत:चे व इतरांचे सुसंगत चित्र साकार करण्याची धडपड - या सर्वांमुळे त्यामध्ये लालित्याचे गुणही उत्पन्न झाले आहेत.

---o---